श्री आनंदनाथ महाराजकृत

# श्री स्वामी समर्थ स्तोत्र



श्री आनंदनाथ महाराज

किंमत ३ रुपये

श्री आनंदनाथ महाराज कृत

# श्रीगुरुस्तव

ॐनमोजी श्रीगुरुनाथा । भक्तवत्सल समर्था ।
तव पदीं ठेवोनि माथा । स्तवितों ताता तुजलागीं । १ ।

मूळ स्वरुप तूंचि निराकारू । अवघा जाण तुझाचि आकारू ।
सच्चित् आनंद आधारू । ॐकारा थारू तूंचि खरा । २ ।

सर्वा पाहातां सर्व आपण । सर्वामाजी सर्व गुण ।
तत्वांचे केलें बंधन । चालविता खुण तूंची खरा । ३ ।

तूंचि माया अतित । तूंचि माया रहित ।
तूंचि मायासहित । परब्रह्म व हीत तूंचि खरा । ४ ।

योग याग आकारु । योग ब्रह्म निराकारु ।
तेथे केलें चराचरु । इच्छामात्रें जाण पां । ५ ।

मूळ आकार गुरु । तया माजील रुकारु ।
तेथें सत्य स्वरुपीं निर्धारु । चित् कारणी पैं झालें । ६ ।

सत्‌चित्ताचा आल्हादु । सहज झाला आनंदु ।
तेथे ॐकारासि बोधु । तीन गुणा निर्मिले । ७ ।

अर्ध मातृका सबळ । सत्य स्वरुपीं केवळ ।
माया बळें अवघा खेळ । लीलामात्रें चालविला । ८ ।

पंच तत्वांचा भास । तेथेंचि झाला आभास ।
मानिती अभ्यास । शुन्यवत् जाणुनी । ९ ।

जें जें आहे तेंचि नाहीं । नाहीं तेंचि पाही ।
तेथेंची मुरोनी राहीं । आत्मस्वरुपा ओळखुनियां । १० ।

होते तें आकाराशी आलें । होणार तें स्तब्ध राहिलें ।
दोहोंचें ऐक्यत्व भंगलें । द्वैत शमलें त्या ठाया । ११ ।

जें पहावें तें असे । तेथोनि तेंही नसे ।
परी शोधितां वसे । शोधा निज गुज । १२ ।

जें आकारा आलें । तेंचि साक्षात्कारीं बोलिलें ।
शून्याच्या ठावा नाहीं गिळिलें । आत्म कळलें कवण्यापरी । १३ ।

मायिक माया मोह । मायेचा बुडाला समूह ।
मग भ्रांतीचा भाव । कवण्या परी । १४ ।

चहुं देहीं चार झाले । चहूं माजीं चार गुंतले ।
ते उलटतां माघारें पावले । पांचवीं मिळाले निजरूपा । १५ ।

आधींच अवघा भासु । याचा न करणें अभ्यासु ।
मानणे तितका नासु । भ्रांति भावें होतसे । १६ ।

होतें तें नाही जाहले । नव्हते तें कोठूनि आलें ।
कैसे भ्रांतीत हे भुलले । मायामोहें करुनियां । १७ ।

आधिच देह आकारु । पंचतवांचा भारु ।
तीन्न गुणे बांधिला सारु । केला वेव्हारु मायेचा । १८ ।

तेथे उमजलिया खूण । मग होईल ओळखण ।
आत्मयाचे ज्ञान । समरूपीं जाणावया । १९ ।

भ्रांतीचा सरलिया भास । मग तो सहजचि प्रकाश ।
जेथें कल्पनेचा नाश । होय दास काळ पायीं । २० ।

तीन्हीं काळांचे बंधन । सहज मोक्ष लाधे साधन ।
मुक्तिचे धन । म्हणती आत्मज्ञानघन तया । २१ ।

आत्मा आत्मींचा वेव्हार । सूक्ष्मी शोधावा बाजार ।
आत्शुद्धि निरंतर । ज्ञानमार्गे होय पाहा । २२ ।

आपला आपण जहालिया वरी । मग सहजचि निवाला अंतरी ।
विश्वांबरी चराचरी । होय निर्धारीं निजरूपा । २३ ।

तेथे नाहीं मी-तूं पण । सहज गळाले द्वैतबंधन ।
मुमुक्ष मोक्षाचे बंधन । तोडिलें साधन सिद्धाचें । २४ ।

नको वेद आकारु निराकारु । स्वयं जाणें ब्रह्म चराचरु ।
तेथेच्च स्थिरावे अंतरु । येर भारु वायां पै । २५ ।

आपण होतां सर्वां ठाईं । मग वासना गळाली पाहीं ।
जेथे भेद नाहीं संदेही । वृत्ती वाहीं कवण्यापरी । २६ ।

आपला आपण भरून गेला । आपणामाजीं आपण जिराला ।
आप–तूं–पणातें विराला । मग उरला काय सांग । २७ ।

जेव्हां आपण तैसें व्हावें । तेव्हां त्या रुपांत मिळावे ।
मग ब्रह्म पाहावे । निज देहीं । २८ ।

जरी चराचरी भरला आकारु । तरी तनुमाजी तोच्चि आधारु ।
मी–तूं–पण वेव्हारु । माया अहंकारू वागविता । २९ ।

मी बुडलिया कारण । माया विराली सहजच्चि जाण ।
तूंपणाची तथें खुण । नाहींच्च भिन्न देखिलें । ३० ।

अवघा ऐक्यामाजी ऐक्य जाहला । तोचि चारामाजी विराला ।
पूर्णानंदी भरूनि राहिला । नामें गुंतला निजरूपा । ३१ ।

तरी अद्वैत ब्रह्मीची खूण । न कळे जिरलिया वांचून ।
जेव्हा जाईल वितळून । तेव्हां मिळणे समरूपी । ३२ ।

जरी हा राहे देहीं । तरी सहज पडे संदेहीं ।
माया भ्रांति तेथें पाही । भ्रम भलीं घालितसे । ३३ ।

देह तत्वीं गोविला । व्यवहार गुणीं वाहिला ।
आपण स्वयेंचि राहिला । निजानंद भोगावया । ३४ ।

आप नाहीं आपण । तेथें नेणेचि जाणीवपण ।
उणीवपणाची खूण । गळोनि केली सर्वथा । ३५ ।

स्वयंजोतीचा प्रकाश । तेजोमय भासवी भास ।
जँववरि नसे तेथें वास । तँववरी अभ्यासें कवण लाभे । ३६ ।

सर्वां ठाईं सर्व भरला । सम विषम स्वयेंचि झाला ।
निजरूपारूपीं मिळाला । तोचि उरला निज ठाया । ३७ ।

शोधिता न कळे कदां । जो अबोध झाला वेदां ।
तो स्थिरचरीं वागे सदां । ज्ञानें खूण जाणती । ३८ ।

स्वयं स्वरूपी रंगावे । ब्रह्मांड स्वरूपीं ऐक्य व्हावें ।
विश्वामाजी भरून जावें । मग पहावे आत्मसुख । ३९ ।

ऐसी विघडलिया सोय । नरदेही जाहला हो अपाय ।
वृथा शिणविली माय । करील हाय बापुडा । ४० ।

आणावे तें काय । तेथे वसे काय ।
कवण त्याची बापमाय । सांग पाय सुदरोनियां । ४१ ।

जरी ब्रह्मी ब्रह्मांड बोलिला । तरी ब्रह्म कैसा कळला ।
कळतां मग वळला । बोलावया कवण्यापरी । ४२ ।

नेणे आणणे जया नसे । जें स्वयं सर्वीं वसे ।
तें बोलवे भासे । कवण्यापरी । ४३ ।

तया देशील काय । घेणार घेईल कैसे पाय ।
वृथा भ्रांतिचा ऊपाय । भरली माय अर्भकाची । ४४ ।

जरी नाहीं समाधान । तरी कैचें ब्रह्मज्ञान ।
ब्रह्मब्रह्मीची ती खूण । आत्म आत्मीं काय निवडीली । ४५ ।

नाहीं तुझें तुज कळले । मग नेणार काय नेईल वहिलें ।
देणार देतो काय लिहिलें । अक्षर बोधीं बोध नव्हे । ४६ ।

जरी जाणसी आनंदाचा छंदु । तरीच जोडेल ब्रह्मानंदु ।
फुका न करीं वादु । चावटा परी । ४७ ।

राजाधिराज योगीराज श्रीगुरूस्वामी समर्थ महाराजकी जय ॥

आनंदनाथ महाराज कृत — **श्रीस्वामीप्रार्थनास्तोत्र**

श्रीगणेशाय नमः । श्रीस्वामीचरित्रस्तोत्र प्रारंभः ।

आधीं नमूं श्रीसद्गुरुनाथा । भक्तवत्सल कृपावंता ।
तुजवांचूनि या जगीं त्राता । अन्य आतां नसेचि । १ ।

अवतार घेतला समर्थ । नाम शोभे कृपावंत ।
पाप जाळूनियां सत्य । भार उतरिला जगतींचा । २ ।

मूळ स्वरूप निर्गुण । निराकार नित्य ध्यान ।
अघटित लीला करूनि जाण । तारिलें जना कौतुकें । ३ ।

म्हणूनि नमन तुझे पायीं । तुजविण अन्य दाता नाहीं ।
विश्वव्यापक तूंच पाहीं । ध्याती हृदयीं साधुजन । ४ ।

रूपारूपासी वेगळा । गुणगुणाच्या निराळा ।
परी अघटित जगीं कळा । सूत्र हातीं वागवित । ५ ।

स्वस्वरूपीं निपुण । साद्र कराया जगतीं पालन ।
स्वामीनाम सगुण । उद्धराकारण धरियेलें । ६ ।

तो दिगंबरवेष द्वैतरहित । दत्तदिगंबर हाची सत्य ।
भार उतरावया यथार्थ । कलियुगीं समर्थ अवतरला । ७ ।

दीन जनांचिया पोटीं । पाप जाळूनि तारी संकटीं ।
नाम जयाचें धरितां कंठीं । मग सृष्टीं भय नाही । ८ ।

ॐ आदिस्वरूपरूपा । ओंकार निर्गुणरूपा ।
जगव्याप्यव्यापककौतुका । दाखविता सखा तूंचि खरा । ९ ।

कोण करील तुझी स्तुति । शेष शिणला निश्चितीं ।
तेथें मानव बापुडे किती । अल्पमती निर्धारें । १० ।

सुख करा स्वामिराया । भक्तवत्सला करुणालया ।
जगतारका तुझ्या पायां । नमन माझें सर्वदा । ११ ।

मी अन्यायी थोर । परी तूं कृपेचा सागर ।
जग तारावया निर्धार । सगुण अवतार धरियेला । १२ ।

जयजयाजी गुरुनाथा । भक्त वत्सला समर्था ।
तुजवांचूनि अन्य त्राता । मज आतां पाहतां नसेचि । १३ ।

सर्व सुख सगुण । अवतार हाचि पूर्ण ब्रह्म जाण ।
जग तारावया कारण । अवतार जाण धरियेला । १४ ।

अनंत ब्रह्मांडांचा नायक । तूंचि सखा माझा देख ।
तुजवांचूनि अन्य कौतुक । नको नको मजलागीं । १५ ।

कैसी करावी तुझी स्तुति । हें मी नेणें बा निश्चितीं ।
चरणीं जडो तुझ्या प्रीती । ऐसे आतां करावें । १६ ।

दीन दयाळा गुरुराया । भावें वंदिलें तुझ्या पायां ।
सोडिली समूळ मोहाची माया । आतां मज वायां दवडूं नको । १७ ।

हें स्तोत्र तुझें लघुस्थिती । तूंचि बोलविता निश्चितीं ।
भक्त तारावया गुरुमूर्ती । अवतारस्थिती दाविली । १८ ।

दीनवत्सला स्वामिराया । अगाधतेज करुणालया ।
अघटित जगतीं तव माया । लीला कौतुक निर्धार । १९ ।

निरंजन स्वरूपरूपा । विश्वरूपा आदिरूपा ।
अक्कलकोटीं दावूनि कौतुका । जगसुखा राहिला । २० ।

अक्कलकोटीं जरी जन । अवचित कोणी जातां जाण ।
उद्धार तया कारण । स्वामिकृपें होय खरा । २१ ।

अवधूतवेष निर्धारी । निर्गुण निराकारी ।
तेज पाहतां थरारी । काळ पोटीं बापुडा । २२ ।

वेदीं रूप वर्णिलें निर्धार । तैसी लीला दाविली साहाकार ।
विश्वविश्वंभर गुरुवर । सद्गुरुनाथ स्वामी माझा । २३ ।

चरण पाहतां सुकुमार । कैसें पूजावें निर्धार ।
ठेऊनि प्रेम गादीवर । सत्य सादर पूजावें । २४ ।

प्रेम गंगा यमुना सरस्वती । सिंधु कावेरी भागीरथी ।
तयासी प्रार्थावें निश्चितीं । स्नानालागीं समर्थाच्या । २५ ।

मन कलश घेऊनि निर्धार । प्रेम गंगा जलसागर ।
स्नान घालूनि उत्तरोत्तर । पूजन प्रकार करावा । २६ ।

आवडी अक्षता निर्धारीं । सुमन संगती घेऊनि वरी ।
सद्गुरुनाथ पूजावा अंतरीं । प्रेमभरी होऊनियां । २७ ।

भक्तिची ती साण । वरी नामाचा चंदन ।
शांती केशर मिळवून । गंध अर्चन समर्थाचें । २८ ।

क्षमा धूप दीप निर्धारीं । प्रेम नैवेद्य वरी ।
भावें समर्पोनि निर्धारी । सद्गदित अंतरीं होऊनियां । २९ ।

क्रोध कापूर जाळावा । प्रेमें स्वामी आळवावा ।
आवडीचा तो ध्यानीं पहावा । शुद्ध चित्त करूनियां । ३० ।

ऐसी पूजा झालियावरी । मग प्रार्थावा निजांतरीं ।
हृदयीं उठती प्रेमलहरी । ऐशापरी आळवावा । ३१ ।

जयजयाजी गुरुराया । जयजयाजी करुणालया ।
भक्ता दाऊनियां पायां । भवभया निवारिलें । ३२ ।

जयजयाजी अनंतरूपा । जयजयाजी आदिरूपा ।
चुकवा चुकवा जन्मखेपा । मार्ग सोपा दाऊनियां । ३३ ।

जयजयाजी त्रिगुणा । जयजयाजी अवतारसगुणा ।
पुरवावया मनकामना । जनीं वनीं फिरियेला । ३४ ।

जयजयाजी दिगंबरा । जयजयाजी सर्वेश्वरा ।
मज सांभाळा लेंकरा । तुजविण आसरा नाहीं नाहीं । ३५ ।

जयजयाजी समर्था । स्वामिराया कृपावंता ।
तुजविण आम्हां त्राता । नाहीं नाहीं जगत्रयीं । ३६ ।

शुद्धतेजा तेजरूपा । दिव्य स्वरूपरूपा ।
चुकवा चुकवा जन्म खेपा । आदिरूपा जगद्गुरू । ३७ ।

जयजयाजी यतिरूपा । जयजयाजी अघटित स्वरूपा ।
निर्गुण सगुणरूपा । सच्चिदानंद जगद्गुरू । ३८ ।

जयजयाजी त्रिगुणरहिता । जयजयाजी त्रिदोषहारका ।
जयजयाजी ब्रह्मांडनायका । निजभक्त सख्या स्वामिराया । ३९ ।

जयजयाजी दत्तात्रेया । जयजयाजी करुणालया ।
जयजयाजी विश्वमाया । संशयभयहारका स्वामिराया । ४० ।

जयजयाजी आनंदविलासा । जयजयाजी पापतमनाशा ।
जयजयाजी अवधूतवेषा । भवभयपाश निवारका । ४१ ।

जयजयाजी निजभक्तपालका । जयजयाजी विश्वव्यापका ।
निज दासासी सखा । कलियुगीं देखा तूं एक । ४२ ।

जयजयाजी विराट्स्वरूपा । जयजयाजी आदिरूपरूपा ।
जयजयाजी विश्वव्याप्य व्यापका । मायबापा गुरुराया । ४३ ।

त्रिलोकीं तूं समर्थ । अवतार तुझाचि यथार्थ
तारक भक्तांलागीं सत्य । गैबीरूप दाऊनि । ४४ ।

तूं पूर्णब्रह्म जाण । निर्विकार निर्गुण ।
निरंजनीं सदा ध्यान । लीला कौतुक दाविलें । ४५ ।

तेज पाहतां थरारे । कली मनीं सदा झुरे ।
विश्वव्यापक व्यापूनि उरे । तारक खरे पतितासी । ४६ ।

तुजवीण आणीक आधार नाहीं । कलियुगीं दुजा आम्हां पाहीं ।
सद्गुरुनाथ तूंची खरा तोही । अवताररूपें नटलासी । ४७ ।

लीला दाविली अगाध । शेषा न करवे त्याचा शोध ।
जे तुम्ही केलें विविध । ज्ञानरूपें जाणविलें । ४८ ।

अक्कलकोटमहापुरीं । वास केला निर्धारीं ।
पवित्रक्षेत्र करूनि तारी । पाय ठेऊनि जगतासी । ४९ ।

तरी जनीं सत्य आतां । अक्कलकोटीं जावें तत्वतां ।
हित साधावया यथार्थां । पवित्र भूमी पैं केली । ५० ।

हे वचन निर्धार । समर्थांचे असे साचार ।
बोल बोलवितां उत्तर । स्वामी माझा निर्धारीं । ५१ ।

अक्कलकोटीं करितां अनुष्ठान । हें स्तोत्र वाचितां एक मास तेरा दिन ।
शुद्ध चित्त करून । ध्यान सदा समर्थांचें । ५२ ।

भिक्षान्न निर्धारीं । पवित्र राहे सदा अंतरी ।
षण्मास वाचितां तरी । महाव्याधी दूर होय । ५३ ।

एक सवंत्सर अनुष्ठान । वटछायेसी करितां जाण ।
तयासी होईल पुत्र संतान । वचन सत्य समर्थांचें । ५४ ।

तेरा मासीं जोडे धन । चतुर्दश मासीं लक्ष्मीवंत जाण ।
प्रेमभावें करितां अनुष्ठान । सत्य वचन निर्धार । ५५ ।

वटपूजा आवडी पूर्ण । तेथेंचि पादुका स्थापून ।
प्रेमभावें करितां अनुष्ठान । मनोरथ पूर्ण होतील । ५६ ।

कलियुगीं तारक निर्धारीं । स्वामी माझा सगुण अवतारी ।
जग तारावया निर्धारीं । सृष्टीवरी पैं आला । ५७ ।

तरी सादर सादर मन । ठेऊनि वंदा आतां चरण ।
पुढें न मिळे ऐसें निधान । मायाबंधन तोडावया । ५८ ।

नाम घेतां निर्धारीं । स्वामी माझा कैवारी ।
भवामाजीं पार करी । वचन निर्धारीं सत्य हो ५९ ।

आनंद म्हणे तरी आतां । स्वामिराया जी समर्था ।
भक्तवत्सला कृपावंता । वाचितां जगव्यथा चुकवावी । ६० ।

हाच देऊनि प्रथम वर । भक्तिपंथ वाढवावा निर्धार ।
आणिक कांही ना मागणें साचार । तुजपाशीं दयाळा । ६१ ।

परोपकार हाचि एक । तुझ्या नामें तारावे लोक ।
आणिक मागणें तें कौतुक । नाही नाही सर्वथा । ६२ ।

विश्व विश्वाकारी । विश्वरूप तूंचि निर्धारी ।
चालविता तुजविण तरी । कोण आहे दयाळा । ६३ ।

तूंचि सर्व सुखदायक । तूंचि कृपा नायक ।
तुजवांचूनि जगा तारक । नाहीं कोणी सर्वथा । ६४ ।

आतां न करीं निष्ठुर चित्ता । माय जाणे बालकाची व्यथा ।
तुजवांचूनि अन्य सर्वथा । माय दुजी न जाणो । ६५ ।

तूंचि मातापिता सर्वेश्वरू । जगतारक जगद्गुरू ।
नको नको अव्हेरूं लेंकरूं । दीना उदारू तूं एक । ६६ ।

दीनदयाघन नाम । तुमचें असे हो उत्तम ।
जग तारावया कारण । स्वामीसमर्थ धरियेले । ६७ ।

महापूर बोरी पायीं उतरला । मैंदर्गीहुनी येतां सोहळा देखिला ।
अक्कलकोटस्थ जनीं डोळां पाहिला । अघटित लीला समर्थांची । ६८ ।

प्रेत उंदीर सजीव केला । मुक्यासी वाचा देउनि बोलविला ।
अंधासी रत्नें पारखविला । अघटित लीला जगीं तुझी । ६९ ।

अघटित केले चमत्कार । किती लिहावे साचार ।
ग्रंथ वाढेल निर्धार । या भेणें सादर लेखणी आवरिली । ७० ।

स्वामिचरित्र ग्रंथ निर्धार । पुढें स्वामिराज बोलविल सादर ।
भक्त तारावया निर्धार । केली जोर मोडोनियां । ७१ ।

म्हणूनियां आतां लघुचरित्र । स्वामीनाम नामाचे स्तोत्र ।
जग तारावया पवित्र । लघुस्तोत्र वर्णिले । ७२ ।

अक्कलकोटीं बहु लीला । ज्यानें दाखविली अघटित कळा ।
कोटिमदनमदनाचा पुतळा । स्वरूपीं ज्याच्या तुळेना । ७३ ।

बहु वर्षे एकभूमी वस्ती । एक विचार एक स्थिती ।
अघटित रूप तें निश्चितीं । जगतालागीं तारावया । ७४ ।

हे निर्जीव पाटावरी । पादुका उठल्या कलिमाझारी ।
अजूनि भुली कैशी जगांतरी । तरणोपाया चुकती हे । ७५ ।

नाम घेतां प्रेमभरीं । हृदय शुद्ध आधीं करीं ।
दया ठेऊनि अंतरीं । वाच निर्धारीं स्वामिलीले । ७६ ।

स्वामिपादुकापूजन । नामस्तोत्र भजन ।
तेणे वंश उद्धारे जाण । कलीमाझारी निर्धार । ७७ ।

म्हणूनियां आतां । स्वामिनाम आठवावें सर्वथा ।
तयावीण अन्य वार्ता । तारक नाहीं जगात । ७८ ।

अहा सुंदरस्वरुपनिधान । अहा भक्तवत्सल अगम्य ध्यान ।
सच्चिदानंद आनंदघन । स्वामी माझा दयाळू । ७९ ।

या प्रपंचमोहाचे काठीं । बुडोनिया जातां रे निकटीं
तुम्हां तरावया सुलभ गोष्टी । स्वामिनाम पोटीं धरा । ८० ।

स्वामिनामाचा प्रताप । पाप जाळूनि करी राख ।
अपूर्व दाविले कौतुक । कालीमाजी तरावया । ८१ ।

तरी आतां शुद्ध करूनि मन । हेचि जाण संध्यास्नान ।
दया क्षमा शांती पूर्ण । गुणवर्णन समर्थांचे । ८२ ।

खोट्याचा जाणूनि सर्व पसारा । तोडी तोडी मायेच्या व्यवहारा ।
न भुले ह्या दुर्गतीच्या बाजारा । मोहपसारा दूर करोनी । ८३ ।

मूळबिंदु हा प्रमाण । तेथोनि वाढविता कोण ।
कोणी केले हो रक्षण । पिंडालागी जाण पां । ८४ ।

कैंची माया कैंचा मोह । कोठे आहे तुझा ठाव ।
तो आधीं शोधुनी पहा हो । भुलूं नको मानवा । ८५ ।

मूळ बिंदूरुप प्रमाण । देह झाला बीजा कारण ।
वाढवोनि करचरण । दीनानाथे अर्पिले । ८६ ।

तेथे झाली जीवशिवाची वस्ती । तीन गुण गुणांची प्राप्ती ।
सहा विकारांची स्थिती । मायेसंगती खेळोनिया । ८७ ।

दया क्षमा शांति विचार । विवेक ज्ञान जागृतीसार ।
अविद्येची गती निर्धार । सोडोनि भवपार करीतसे । ८८ ।

धरितां स्वामी नावांची आवडी । घेतां भवामाजीं घाली उडी ।
नेवोनि भक्तां पैलथडी । पार करी दयाळू । ८९ ।

नाम जगी तारक । काय सांगू नामाचे कौतुक ।
नामें तारिले कितीएक । महापापी कलियुगीं । ९० ।

नाम घेतां संकट हरे । वारी केल्या पाप सरे ।
सेवा करितां भवांत तरे । चुकती फेरे चौऱ्यांशींचे । ९१ ।

अक्कलकोटी न जातां तरी । वटछायेसी अनुष्टान करी ।
तयासी तारक निर्धारीं । दृष्टांतरुपें स्वामी माझा । ९२ ।

स्वामींची मूर्ति मनोहर । प्रेमे घेऊनि अयन्यावर ।
भावें मांडोनि गादीवर । पूजन करावे प्रेमभावें । ९३ ।

भजनपूजनाच्या रीती । कलिमाजी जग उद्धरती ।
प्रेम ठेऊनियां चित्तीं । स्वामी कृपामूर्ति आठवावा । ९४ ।

काय न करी श्रीगुरुनाथ । सत्य होती शरणागत ।
भक्ततारक अवतार समर्थ । कलियुगीं यथार्थ अवतरला । ९५ ।

विश्वव्यापक विश्वंभरु । त्यासी कैंची समाधी निर्धारु ।
जगीं जगप्रकार दाखवणें साचारु । लीला थोरु समर्थांची । ९६ ।
द्वैत नाहीं तिळभरी । आशा कैंची अंतरीं ।
योगमाया दवडिली दुरी । अवतार निर्धारी स्वामी माझा । ९७ ।
भक्तांकारणें अक्कलकोटीं । वास केला हो निकटीं ।
पाय दाऊनियां सृष्टीं । पतित उद्धार करविला । ९८ ।
अघटित कळा अघटित लीला । पूर्णतेज तेजाचा पुतळा ।
अगम्य ज्याची अवतार लीला । कलीचा सोहळा मोडावया । ९९ ।
तरी नामाची संगती । प्रेम ठेऊनी सदा चित्तीं ।
स्वामी आठवा दिवसरात्री । भवामाजी तरावया । १०० ।
स्वामीनामाचा सोहळा । धाक पडे कलिकाळा ।
निजदासासी सांभाळी वेळोवेळां । अवतार सोहळा करुनियां ।१०१।

कलिमाजी तारक। भक्तांसी एकचि नाम देख।
स्वामिरायाविण कौतुक। आणिक नको सर्वथा। १०२।

स्वामिनामाचें किर्तन। सप्रेम पादुकापूजन।
करितां कलीमाजीं जाण। जन उद्धरे निर्धारें। १०३।

स्वामीपंथ तारक। भव नाशील हा सत्य देख।
कलीमाजीं जगतारक। परम सुखदायक उद्भवला। १०४।

म्हणूनि जनीं आपुल्या हिता। शरण जावें श्रीगुरुनाथा।
मुखीं धरोनि स्वामिवार्ता। जन्मव्यथा चुकवावी। १०५।

ऐसी भुललिया सोय। पुढें नाहीं रे उपाय।
भवाचा हा भय। दूर करावा निर्धारी। १०६।

तरी सुंदर मानवाची काया। नेवोनि लावा स्वामिपाया।
सुखें निवारा भवभया। मोहमाया तोडोनियां। १०७।

समर्थें दिधलें अभय वचन । जो हें स्तोत्र करील पठण ।
तयाचे मनोरथ पूर्ण । होतील जाण मज कृपें । १०८ ।
येथें धरितां संशय । तयासी भवामाजी भय ।
पुढें नाहीं ऐशी सोय । सत्य सत्य त्रिवाचा । १०९ ।
हे लघुस्तोत्र समर्थांचे । मनोभावे करितां पठण याचें ।
अर्थ पूर्ण होतील अर्थिकांचे । परमार्थकांसी मोक्षपद । ११० ।
आनंद म्हणे तरी आतां । स्वामिचरणीं ठेऊनी प्रीति सर्वथा ।
प्रेमभावें स्तोत्र गातां । मोक्ष हातां येईल । १११ ।
इति श्रीस्वामी प्रार्थनास्तोत्र । हें जगतारक पवित्र ।
जपामाजिं महामंत्र । अर्थ सादर पुरवावया । ११२ ।
इति श्रीगुरुस्वामिचरणारविंदार्पणमस्तु ।
राजाधिराज योगीराज श्रीस्वामी समर्थ महाराजकी जय ।
श्रीरस्तु । शुभभंवतु । (श्री आनंदनाथ महाराज कृत)

# अभंग

(१)

आधी नमूं तुमच्या पायां । भक्तवत्सल स्वामिराया ॥ १ ॥
तूंचि माझा बुद्धिदाता । शरण शरण हो समर्था ॥ २ ॥
चौदा विद्यांच्या दातारा । शिरीं ठेवा अभय करा ॥ ३ ॥
चौसष्ट कळांचा हा रंग । तुझ्या पायींचा सुरंग ॥ ४ ॥
आनंद म्हणे आदि अंत । आम्ही नमिला समर्थ ॥ ५ ॥

(२)

देह रंग रंगुनि जावा । ठायीं ठायीं स्वामी पाहावा ॥ १ ॥
हीच भक्तिची कसोटी । खरी राखा रे लंगोटी ॥ २ ॥
कैंची संचिताची जोडी । धन वेंची कवडी कवडी ॥ ३ ॥
आनंद म्हणे बंड झाले । भक्तीविणें नरका गेले ॥ ४ ॥

(३)

धन्य अक्कलकोट, धन्य ही बा पेठ। सत्य भुवैकुंठ देखीयले ॥ १ ॥
सुंदर देऊळ समर्थांचे जाण। शोभा ही बा पूर्ण आणीतसे ॥ २ ॥
काय वानूं आतां तेथिल हें भाग्य। मुक्ति लागे वेगें पायरीसी ॥ ३ ॥
जोडोनिया कर देव लोटांगणी। लोळती चरणी समर्थांच्या ॥ ४ ॥
आनंद म्हणे ऐसे पूर्ण परब्रह्म। अक्कलकोटी वर्म राहीलेंसे ॥ ५ ॥

## एकारती

प्रेमभावे श्रीगुरुपायी एकारती करूं।
अनंत ब्रह्म रोमी त्यासी कैसें हो धरूं ॥ १ ॥
सर्व ठाव भाव पायीं ओवाळींला।
एकारतीचे ध्यान प्रभु ओवाळूं तुजला ॥ २ ॥
तनमन अवघें एकत्र केलें।
निजानंद भावें तुजला हो भुलवीलें ॥ ३ ॥
सोहं शब्द स्वरूपी समरूप झालों।
निजानंदीं आनंद रूपासीं मिळलों ॥ ४ ॥

# श्री स्वामी समर्थ ध्यान

ध्यान हें तुझें देखतां बरें । रूप तें कसें जाण साजिरें ।
पूर्ण ब्रह्म तूं विश्वकारणा । सगुण रूप हें जग तारणा ॥ १ ॥

काय गूण ते कवण हे लिला । दिव्य मंचकी स्वामी शोभला ।
केशर उटी भाळिं चर्चिली । मध्य कस्तुरी रेखिली भली ॥ २ ॥

धनुष्य आकृती भोंवया तरी । मध्य भृकुटी शोभे साजिरी ।
पद्मनेत्र हो देखतां भले । रूप तें कसें मुख शोभले ॥ ३ ॥

कठी ती बरी शोभे साजिरी । रूद्राक्ष तरी मध्य निरंतरी ।
माळ हे बरी दिसे साजिरी । मूर्ती ही तुझी कैसी गोजिरी ॥ ४ ॥

कौपिन कळा कटीसि मेखळा । रंग ना निळा शुभ्र सांवळा ।
काय रंग तो कोण वर्णिल । वेद वर्णिता मौन्य पावेल ॥ ५ ॥

दिनवत्सला स्वामी राजसा । कां न पावसी आजि हो कसा ।
कोठें गुंतला कवण त्या परी । कवण भक्त हो धरी पदरी ॥ ६ ॥

म्हणुनिया तुला वेळ लागला । धांव पाव तूं आजि गा भला ।
गजेंद्रस्तवनें तूचि धावसी । भक्त-संकटी बापा रक्षिसी ॥ ७ ॥

तुजविणें आम्हा कोण हो तरी । आजि धांव गा जाण लौकरी ।
सर्व सुख तें देखतां तुला । बापा सांभाळी आजि या मुला ॥ ८ ॥

मायबाप तूं जाण सोयरा । आमुचा तरी आसरा खरा ।
भेट देऊनी तोषवी मना । हाति धरिलें जाण चरणा ॥ ९ ॥

स्तोत्र वाचिता दुःख ते सरे । प्रेम धरील्या भव हा तरे ।
सत्यसंकटी स्वामी सांभाळी । स्तोत्र वाचितां पुरवि आळी ॥१०॥

आनंदनाथ तो बोलला तरी । स्वामी बोलवी जाण वैखरी ।
म्हणुनि सांगतो तुमच्या हिता । स्तोत्र वाचिता जाईल व्यथा ॥११॥

**श्री. स्वामी समर्थ स्तवन गाथा**

श्री आनंदनाथ महाराज कृत पृष्ठ संख्या ६००

रंगीत फोटोज, किंमत २१० रु.

**परमहंस पद्मनाथ तीर्थ स्वामी महाराज**

चरित्र आणि शिकवण, स्वामी परिवार, स्तोत्रें, अभंग.

रंगीत छायाचित्रें किंमत ६० रु.

**आज्ञार्थी गीता**

लेखक : व. दि. कुळकर्णी

किंमत १५ रु.

पत्ता : **गुं. फ. आजगांवकर**

१७ के. डी. जी. बी. निवास

मॅजेस्टिक समोर, मुंबई ४.

श्री आनंदनाथ महाराजकृत

# श्री स्वामी समर्थ स्तोत्र

प्रकाशक : गुं. फ. आजगांवकर,
१७, के. जी. बी. निवास, मुंबई–४.

मुद्रक : वि. ज. देसाई, वैभव प्रिंटिंग प्रेस, प्रार्थना समाज नाका, गिरगाव, मुंबई–४०० ००४.



श्री स्वामी समर्थ